**रोजगार मेळावे आयोजित करतांना होणाऱ्या खर्चामध्ये सुधारणा करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२२/प्र.क्र.११०/प्रशा.२ (रोजगार)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०२२

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.धोरण २०००/ प्र.क्र.१५८/रोस्वरो-१, दिनांक ६ ऑक्टोबर, २०००
२) शासन निर्णय क्र.रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.रोस्वरो-२००७/ प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक २९ जून, २००७
३) शासन निर्णय क्र.रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.रोस्वरो-२००७/ प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक १३ ऑगस्ट, २००९
४) शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.रोस्वरो-२००७/ /प्र.क्र.४१, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११
५) आयुक्तालयाचे पत्र क्रमांक : कौविरोउआ/कक्ष-८/योजना/प्र.क्र.४/२२/ रोजगार मेळावे/२०२२/९१००, दिनांक १८.१०.२०२२

**<u>प्रस्तावना :-</u>**

आयुक्तालयाच्या अधिनस्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच कामाकाजामध्ये कालानुरुप बदल करणे, तसेच यंत्रणेमध्ये नव्याने काही योजना किंवा उपक्रम राबविणे , सद्य:स्थितीचा विचार करुन काही योजना बंद करणे अथवा इतर विभागास हस्तांतरीत करणेचा प्रस्ताव विचाराधीन आहे. याबाबत आयुक्तालयाच्या स्तरावर एक अभ्यासगटाची समिती गठीत करण्यात आली आहे. सदर अभ्यासगटाने पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे या योजनेबाबत केलेले कामकाज व सदर कामकाज करतांना येत असलेल्या अडचणी व सदर योजनेबाबत सर्वकष विचार करुन पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे ही योजना सुधारीत स्वरुपात राबविण्याबाबत दिनांक १८.१०.२०२२ च्या पत्रान्वये शिफारस केली आहे. राज्यातील स्थानिक बेरोजगार रहिवासींना जास्तीत जास्त रोजगार मिळावा हे उद्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने विविध उद्योजक /आस्थापना यांचेकडून रिक्त पदे अधिसूचित करुन घेऊन सदर मेळावे व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय यांचे समवेत आयोजित करणे तथा अप्रेंटीसशिप सबंधित रिक्तपदे ही सदर मेळाव्यात उपलब्ध करुन घेणे. स्वयंरोजगार इच्छूक उमेदवारांकरीता कर्ज उपलब्ध करुन देणारी विविध शासकीय महामंडळे, राष्ट्रीयकृत /खाजगी बँक /वित्तीय संस्था, शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार राबविणारे विभाग इत्यादी यांना मेळाव्यात आमंत्रित करणे , उमेदवारांना मार्गदर्शन /माहिती देण्यासाठीचे स्टॉल्स लावणे याशिवाय मेळाव्यामध्ये उमेदवारांना रोजगार , स्वयंरोजगार, कौशल्य विकास प्रशिक्षण, बायोडाटा तयार करणे, भविष्यात उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधी, मुलाखतीची तयारी इ.बाबत मार्गदर्शन /

समुपदेशन करणे यासाठी राज्यातील रोजगार मेळाव्याचे अधिक प्रभावीपणे आयोजित करणे आवश्यक आहे. मागील ११ वर्षात महागाई निर्देशांकात वाढ झाली असून मेळाव्यासाठी केलेली तरतूद अपूरी आहे. रोजगार मेळाव्याचे प्रभावी आयोजन करण्यासाठी प्रत्येक रोजगार मेळाव्यासाठी रुपये ५ लाख एवढी तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महसुली विभाग/जिल्हास्तरीय रोजगार मेळावा आयोजनासाठी खालीलप्रमाणे खर्चाची वाढीव मर्यादा प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | रोजगार मेळावा स्तर (प्रत्येक ऑफलाईन फक्त) | सध्याची मर्यादा प्रती मेळावा | प्रस्तावित मर्यादा प्रती मेळावा |
|---|---|---|---|
| १ | **विभागीयस्तर** | रु.१.०० लाख | रु.५.० लाख |
| २ | **जिल्हास्तर** | रु.६०,०००/- व ४०,०००/- | रु.५.०लाख |

५. खर्च सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष २२३०११०७ उद्दीष्ट (३४) या अंतर्गत रु.३,६१,१५,०००/- (रुपये तीन कोटी एकसष्ट लाख पंधरा हजार फक्त ) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद असून त्यापैकी रु.१,५१,७०,०००/- (रु.एक कोटी एकावन्न लाख सत्तर हजार फक्त) अनुदान वितरण प्रणालीवर (बीडीएस) वितरीत करण्यात आली आहे. उपरोक्त प्रयोजनाकरीता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या मर्यादेत करण्यात येईल.

६. प्रत्येक ऑफलाईन जिल्हास्तरीय मेळाव्यासाठी रुपये ५ लाख इतक्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे तसेच त्यातील रु.१ लाख इतकी रक्कम मेळाव्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी खर्च करण्यात यावी. सदरचा खर्च हा मागणी क्रमांक झेडए-१, २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगारविषयक सेवा (२२३० ११०७),३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. संदर्भाधीन यापुर्वीच्या शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती कायम रहातील.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २६९/व्यय-६, दिनांक ०३.११.२०२२ व नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०७/१४७१, दिनांक २७.१०.२०२२ नुसार त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२११०७१५०५५६७००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRABHAKAR A SANKHE

Digitally signed by PRABHAKAR A SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT ENTREPRENEURSHIP AND EMPLOYMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1bac9385344f87e77e1084162b6716914d02e353160fac64808fec76c25d6d90, pseudonym=11AF006A9B8244D291C83FCA56E433781EE9E76C, serialNumber=2F853CAC13002D53D7034663C6F0D48D3ADE65B7222B4D38B6E5902DB13A4750, cn=PRABHAKAR A SANKHE
Date: 2022.11.07 15:09:08 +05'30'

**( प्रभाकर संखे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव
६) सर्व मा.विधानसभा सदस्य
७) मा.विधानसभा सदस्य
८) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव
९) वित्त विभाग (अर्थसंकल्प-२०/अर्थसंकल्प -३) व्यय-६
१०) नियोजन विभाग
११) सर्व मंत्रालयीन विभाग
१२) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५) महालेखापाल, महाराष्ट्र -१( लेखा व अनुज्ञेयता)मुंबई
१६) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा परीक्षा) मुंबई
१७) महालेखापाल, महाराष्ट्र -२( लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
१८) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा परीक्षा) नागपूर
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
२१) सर्व सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
२२) सर्व कार्यासने (कौशल्य ,रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग) मंत्रालय, मुंबई.